RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com

पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!







मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-05 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Friday 02 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ०५ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शुक्रवार, दि. ०२ मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

## दहशतवाद्यांचं टूलकीट लागले तपास यंत्रणांच्या हाती, सांकेतिक शब्दांपासून पोशाख व शस्त्रांसंबंधीची माहिती समोर

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यामुळे देश हादरला आहे. एनआयएसह (राष्ट्रीय तपास यंत्रणा) इतर संरक्षण दलांची पथकं व गुप्तचर यंत्रणा या हल्ल्याचा तपास करत आहेत, तसेच काश्मीर खोऱ्यात लपलेल्या दहशतवाद्यांचा शोध घेत आहेत. दरम्यान, दहशतवाद्यांचं एक असं टूलकिट तपास यंत्रणांच्या हाती लागलं आहे ज्याच्या मदतीने हे दहशतवादी पहलगाममध्ये दाखल झाले आणि हल्ला करून फरार होण्यात यशस्वी झाले. दहशतवाद्यांना पहलगाममध्ये पाठवण्यापूर्वी त्यांच्या म्होरक्यांनी जे धडे दिले होते ते या टूलकिटमध्ये आहेत. तसेच यामध्ये दहशतवाद्यांचे कोड वर्ड्स (सांकेतिक शब्द) आणि दिशा-निर्देश देखील आहेत.

या टूलकिटमध्ये दहशतवाद्यांसाठी मार्गदर्शक सूचना, सांकेतिक शब्द, मदत करणाऱ्यांची माहिती, शस्त्रांस्त्रांची माहिती, साहित्य कुठे पोहोचवायचं आहे, त्यांना लागणारं साहित्य कुठे मिळेल याबाबतची माहिती व नकाशे आहेत.

### गुप्त बैठकांचे नियम, दहशतवाद्यांसाठीच्या सूचना

1.वस्तू, शस्त्रास्त्र किंवा माहिती देण्यासाठी एकांत असलेली जागा निवडावी, जिथे लोकांची फार वर्दळ नसावी.

2.हे ठिकाण शासकीय इमारतींपासून लांब असायला हवं, जसे की स्मशानभूमी किंवा उद्यान

3.वस्तू किंवा शस्त्रे हस्तांतरित करण्यापूर्वी पूर्ण तयारी करावी.

4.कुठल्याही ठिकाणी ठरलेल्या वेळेत पोहायला हवं, वस्तू निर्धारित वेळेत पोहोचवल्या पाहिजेत.

5.हातात घड्याळ व पायात आरामदायी बूट असले पाहिजेत.

6.सामान ड्रॉप करण्यापूर्वी तिथे एक विशेष खूण करावी. जेणेकरून ती वस्तू पिक करणारी (उचलणारी) व्यक्ती त्या वस्तूची ओळख पटवू शकेल.

7.इस्लामिक पोशाख परिधान करू नका, पाश्चात्य, आधुनिक किंवा स्थानिकांसारखे कपडे परिधान करावेत.

8.कुठल्याही मित्राबरोबर फिरू नका.

9.तुमचं साहित्य, शस्त्रे जिथे ठेवाल ती जागा निवासस्थानापासून दूर असावी.

### या टूलकीटमध्ये डेड ड्रॉप पॉलिसीसाठी चार कोड वर्ड्स (सांकेतिक शब्द) आहेत.

1.बिझी : साहित्य, शस्त्रे पोहचवता आली नाहीत तर असा कोड वर्ड वापरावा.

2.खतरा : ड्रॉपच्या जागी (जिथे साहित्य पोहचवायचं आहे ती जागा) धोका आहे. तिथे कोणीही जाऊ नये. तसेच आपण संरक्षण यंत्रणेच्या, गुप्तचरांच्या रडारवर आहोत हा संदेश पोहोचवण्यासाठीचा सांकेतिक शब्द.

3.ड्रॉप : साहित्य योग्य ठिकाणी सुरक्षितपणे पोहोचवलं आहे.

4.पिक्ड अप : साहित्य मिळालं आहे किंवा जिथे ठेवलेलं तिथून उचललं आहे.

## मे महिन्यात वाढणार उकाड्याचा कहर!

### 11 दिवस उष्णतेची लाट वाढणार! जाणून घ्या हवामान अंदाज

सुनील बाचरे
अंबरनाथ प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------




२०२५ च्या मे महिन्यात भारताला प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागणार आहे, असा इशारा भारतीय हवामान विभागाने (IMD) दिला आहे. राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड या भागांत सामान्यपेक्षा १ ते ४ दिवस अधिक उष्णतेच्या लाटेचे दिवस नोंदवले जाण्याची शक्यता आहे. आयएमडीचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले की, एप्रिलमध्ये आधीच ७२ उष्णतेच्या लाटांचे दिवस नोंदवले गेले असून, मे महिन्यात ही संख्या आणखी वाढू शकते. गुजरात व राजस्थानमध्ये ६ ते ११ दिवस, तर विदर्भ, ओडिशा, छत्तीसगड येथे ४ ते ६ दिवस ही लाट राहू शकते. महाराष्ट्रात तुलनेने कमी परिणाम होईल, परंतु उष्णतेपासून पूर्ण सूट मिळणार नाही. तरीही एक दिलासादायक बाब म्हणजे, मे महिन्यात वारंवार येणाऱ्या वादळांमुळे तापमान काहीसं नियंत्रणात राहू शकते. मे २०२४ मध्ये जसे अती तापमान पाहायला मिळाले, तशी स्थिती यंदा टळण्याची शक्यता आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, देशातील बहुतांश भागात पावसाची पातळी सामान्य ते जास्त राहील. मात्र वायव्य, मध्य आणि ईशान्य भारतात पावसाचे प्रमाण थोडेसे कमी राहू शकते.

उत्तर भारतात मात्र, १०९ टक्के सरासरीपेक्षा अधिक पाऊस होण्याचा अंदाज आहे, ज्यामुळे उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळू शकतो.

## धर्मांतराचा धक्कादायक प्रकार! प्राध्यापकाची हिंदू विद्यार्थ्यांवर नमाज पठणाची जबरदस्ती

### 7 शिक्षकांसह 8 जणांविरुद्ध गुन्हा दाखल; मुख्य आरोपीला अटक

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



रायपूर छत्तीसगढ येथील विलासपूर जिल्ह्यात धर्मांतराचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बिलासपूर जिल्ह्यात राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) कॅम्पदरम्यान हिंदू विद्यार्थ्यांवर नमाज पठण करण्याची जबरदस्ती केल्याचा प्रकार घडला आहे. कॅम्पदरम्यान प्राध्यापकाकडून विद्यार्थ्यांवर धर्मांतराचा प्रकार सुरु असून विद्यार्थ्यांनी या घटनेचा निषेध व्यक्त करत प्राध्यपकाविरोधात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी ७ शिक्षकांसह ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून या प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ मार्च ते १ एप्रिल या कालावधीत कोटा पोलिस स्टेशन हद्दीतील शिवराय गावातील शिबिरात १५९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सहभागी झालेल्या १५९ विद्यार्थ्यांपैकी फक्त ४ विद्यार्थी मुस्लिम होते; परंतु विद्यापीठाने सर्व विद्यार्थ्यांना नमाज पठण करण्यास भाग पाडले. विद्यार्थ्यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला आणि तक्रार दाखल केली. दिलीप झाल असे प्राध्यापकाचे नाव असून बिगर मुस्लीम विद्यार्थ्यांना नमाज पठण करण्यास भाग पाडल्याच्या आरोपाखाली गुरु घासीदास केंद्रीय विद्यापीठाच्या एका प्राध्यापकाला आज अटक करण्यात आली. त्याचबरोबर सहा प्राध्यापकांसह एका विद्यार्थ्यावर भारतीय न्याय संहिता आणि छत्तीसगड धर्म स्वातंत्र्य कायद्यांतर्गत धर्माच्या आधारावर द्वेष पसरवणे, धार्मिक भावना दुखावणे आणि इतर गुन्ह्यांसाठी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डीएसपी रश्मीत कौर चावला यांनी सांगितल्यानुसार, या घटनेसंदर्भात २६ एप्रिल रोजी ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी कठोर पावले उचलून या प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक केली आहे.

**हिंदू संघटना आक्रमक**

या घटनेप्रकरणी हिंदू संघटनांनीही आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली. यानंतर पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू केला. बिलासपूरचे एसपी रजनीश सिंह यांनी चार सदस्यांची समिती स्थापन केली होती. शहर अधीक्षक (कोतवाली) अक्षय सबादरा यांच्या नेतृत्वाखाली ही चौकशी करण्यात आली. समितीच्या अहवालाच्या आधारे झा आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच इतर लोकांविरुद्धही चौकशी सुरू असल्याचे चावला यांनी सांगितले.

## निकोबार बेटावर वेळेआधीच मोसमी पाऊस येणार

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



देशभरात उन्हाळ्याचा कडाका वाढत असतानाच दक्षिण भारताच्या दिशेने मोसमी पावसाच्या आगमनाची चाहुल लागायला सुरुवात झाली आहे. हवामान अभ्यासकांच्या प्राथमिक अंदाजानुसार यंदा मोसमी पाऊस वेळेच्या आधीच निकोबार बेटांवर दाखल होण्याची शक्यता आहे. हवामान अभ्यासकांनी दिलेल्या माहितीनुसार, अंदमान आणि निकोबार बेटांजवळील समुद्रसपाटीवर सध्या ढगांच्या हालचाली आणि वाऱ्याचा वेग यामध्ये लक्षणीय बदल दिसून येत आहेत. हे लक्षण वेळे आधी मोसमी पावसाच्या आगमनाची चाहुल देत आहे. सामान्यतः मोसमी पाऊस मेच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात या भागात दाखल होतो. मात्र यंदा तो एक आठवडा आधी दाखल होणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. निकोबार बेटांवर मोसमी पाऊस कधी दाखल होतो, यावरून भारतात नैऋत्य मोसमी वाऱ्याची प्रगती, वेग, वेळ, आणि पावसाचा अंदाज बांधला जातो. त्यामुळे येथील बदलांकडे संपूर्ण देशाचे लक्ष असते.

### मोसमी पाऊस १५ मेदरम्यान दाखल होतो

निकोबार बेटांवर मोसमी पाऊस सामान्यतः १५ मेच्या आसपास दाखल होतो. भारतातील मोसमी पावसाचे सर्वप्रथम आगमन होणारा हा भाग आहे. या भागात पूर्वी १० मे, अथवा १८ ते २० मेदरम्यान मोसमी पाऊस दाखल झाला आहे . यंदा मात्र १० मेच्या आसपास मोसमी पाऊस दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. याआधी १७ वर्षांपूर्वी म्हणजेच २००७ आणि २००८ साली १० मे रोजी निकोबार बेटांवर मोसमी पाऊस दाखल झाला होता.

### निकोबार बेटांवरील हवामान

निकोबार बेट हे बंगालच्या उपसागरात असून, येथील हवामान उष्ण व दमट आहे. वर्षभर उष्णता आणि आर्द्रता कायम असते. येथे दोन मुख्य पावसाळी हंगाम अनुभवले जातात.

### दक्षिण-पश्चिम मोसमी पाऊस (मुख्य मोसमी पाऊस)

- सुरुवात: साधारणतः १५ मेच्या आसपास
- शेवट ऑक्टोबरच्या सुरुवातीपर्यंत
- याच काळात सर्वाधिक पर्जन्यमान होते.
- अंदमान-निकोबार हा भारताच्या मोसमी प्रवासाचा पहिला टप्पा आहे.

### ईशान्य मोसमी पाऊस (हिवाळी पावसाचे काही प्रमाण) :

- ऑक्टोबर-डिसेंबरदरम्यान
- तुलनेत कमी पाऊस, पण दमट हवामान कायम

### सरासरी पर्जन्यमान

निकोबार बेटांमध्ये वर्षाला ३०००- ३८०० मिमी पाऊस पडतो, तो भारताच्या इतर भागांपेक्षा अधिक आहे.

### भौगोलिक प्रभाव

घनदाट जंगल, जैवविविधता आणि किनारपट्टीवर आधारित जीवनशैली यामुळे पावसाचा येथील जनजीवनावर मोठा प्रभाव असतो. पाऊस लवकर पडल्यास बेटांवरील शेतीला चालना मिळते.

### पावसाच्या नोंदी

पोर्ट ब्लेअरमध्ये २७ ऑगस्ट २०१६ रोजी २४ तासांत १७९ मिमी पावसाची नोंद झाली होती. त्यावेळची २४ तासांतील ती उच्चतम नोंद होती. सामान्यतः अंदमान आणि निकोबार बेटांमध्ये वार्षिक सरासरी पर्जन्यमान सुमारे २,९६७ मिमी असते. ३० सप्टेंबर २०२३ रोजी दक्षिण अंदमानमध्ये एकत्रित पर्जन्यमान २,२२७.२ मिमी इतके नोंदवले गेले. या बेटांमध्ये पावसाचे प्रमाण वर्षानुवर्षे वाढत असल्याचेही निरीक्षणात आले आहे. विशेषतः, निकोबारमध्ये दरवर्षी सरासरी पर्जन्यमानात २.८४ मिमी वाढ होत असल्याचे एका अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.

## 'कोणालाही सोडणार नाही, शोधून काढणार आणि वेचून मारणार'

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------




पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्यांना वाटत असेल की ते जिंकले तर तो त्यांचा भ्रम आहे. त्यांना शोधून काढून आणि वेचून मारू. हा नरेंद्र मोदींचा भारत आहे. एक - एक करुन बदला घेतला जाईल; असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले. ते दिल्लीत एका सार्वजनिक सभेत बोलत होते. पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर पहिल्यांदाच सार्वजनिक सभेत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दहशतवादी आणि त्यांना मदत देणाऱ्या पाकिस्तानला सज्जड दम दिला. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली, मग ते ईशान्य भारत असो, डाव्या विचारसरणीच्या अतिरेक्यांचा प्रदेश असो किंवा काश्मीरमधील दहशतवाद असो आम्ही प्रत्येकाला प्रत्युत्तर देत आहोत. जर कोणाला वाटत असेल की हल्ला केला आणि ते जिंकले तर तो त्यांचा भ्रम आहे. त्यांना शोधून काढून आणि वेचून मारू. हा नरेंद्र मोदींचा भारत आहे. एक - एक करुन बदला घेतला जाईल. कोणालाही सोडले जाणार नाही; असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले. दहशतवाद संपेपर्यंत लढा सुरू राहील. ज्यांनी पहलगाममध्ये नागरिकांची हत्या केली त्यांना शिक्षा होईल. परिणाम भोगावेच लागतील, असा इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिला. काश्मीरमध्ये ९० च्या दशकापासून दहशतवाद आहे. पण मोदी सरकार दहशतवादाच्या विरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण राबवत आहे. नागरिकांचे प्राण घेणाऱ्यांना परिणाम भोगावे लागतील.

दहशतवादाविरुद्धची लढाई म्हणजे मोठ्या प्रवासातील एक टप्पा आहे. प्रत्येकाला योग्य वेळी योग्य पद्धतीने उत्तर दिले जाईल; असे अमित शाह यांनी सांगितले. देशाच्या कानाकोपऱ्यातून दहशतवादाचा बीमोड केला जाईल, असेही अमित शाह म्हणाले. दहशतवादाच्या विरोधात लढण्यासाठी भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक देशांचा पाठिंबा मिळत असल्याचे गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले. संपूर्ण जग भारताच्या बाजूने उभे आहे. दहशतवादाला तोंड देण्यासाठी जगातील अनेक देश एकत्र येत असून ते भारताच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहत आहेत; असे अमित शाह म्हणाले. याआधी जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी अतिरेकी हल्ल्यात २५ पर्यटक आणि एक स्थानिक अशा २६ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर केंद्राकडून तातडीने अमित शाह जम्मू काश्मीरमध्ये पोहोचले होते. त्यांनी पहलगाम येथील हल्ल्याच्या ठिकाणी पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच मृतांना श्रद्धांजली वाहताना दहशतवाद्यांना धडा शिकविणार असल्याचे जाहीर केले होते.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

संपादकीय

# ट्रम्प हरले, ट्रम्प जिंकले!

ट्रम्प यांच्याशी दोस्ताना वा साधर्म्य हे अन्य देशांत आतबट्ट्याचे ठरू शकते असा संदेश कॅनडातील निवडणूक निकालातून मिळतो. एका देशाचा उचापतखोर नेता शेजारील देशाच्या निवडणुकीत इतका निर्णायक ठरतो याचे दुसरे उदाहरण सापडणे अवघड. पहिले कॅनडात २९ एप्रिलच्या निवडणुकीत जे काही झाले त्यात सापडावे. या निवडणुकीत सत्ताधारी 'लिबरल' पक्षाचे मार्क कार्नी विजयी झाले. या विधानातून पुरेसा बोध होणे अवघड. जानेवारीत ज्यास पंतप्रधानपदावरून पायउतार व्हावे लागले ते जस्टीन ट्रुडो आणि कार्नी हे एकाच पक्षाचे. ट्रुडो गेले दशकभर पंतप्रधानपदी होते. या काळात ते कॅनडाचा जागतिक चेहरा बनून गेले होते आणि त्यांचा 'लिबरल' पक्ष दशकभराच्या सत्तापभोगाने सुस्त झालेला होता. त्यातूनही गेली दोन वर्षे ट्रुडो यांच्यासाठी घसरगुंडीची ठरली. कॅनडाची अर्थव्यवस्था मरगळू लागलेली होती आणि ती चेतवण्यासाठी ट्रुडो यांस नवीन काही चमकदार राबवता येत नव्हते. साधारण दशकभराच्या सत्तेत कोणताही, कितीही कार्यक्षम असलेला नेता नावीन्य हरवतो आणि पहिल्यांदा सत्तेत येण्यासाठी जे केले त्याच्याच रेघोट्या ओढत राहतो. तथापि नवे काही करता न आल्यास नेतृत्वावरील परतावा उत्तरोत्तर घसरू लागतो. अशा वेळी काही भावनिक, विद्वेषी मुद्दा आवश्यक. नपेक्षा सदर नेत्याचा नेतृत्वदीप मंदावू लागतो. ट्रुडो यांनी भारताविषयी विद्वेष निर्मिती करून तो प्रयोग करून पाहिला. पण फसला. कारण हा काही हिंदू-मुसलमान, इस्रायली-पॅलेस्टाईन, गोरे विरुद्ध कृष्णवर्णीय इतका तीव्र विषय नाही. त्यामुळे तो फसला यात आश्चर्य नाही. परिणामी ट्रुडो यांची लोकप्रियता झपाट्याने घसरली आणि त्यातूनच जानेवारीत त्यांस पदत्याग करावा लागला. ट्रुडो यांच्यामुळे त्यांच्या पक्षाविषयीदेखील इतकी नाराजी होती की निवडणुकीत हा पक्ष हरणार हे स्पष्ट जाणवू लागले. तथापि एका राजकीय चमत्काराने वातावरण बदलले.

तो घडला शेजारच्या अमेरिकेत. याआधी दोन महिन्यांपूर्वी निवडून आलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांचे राज्यारोहण झाले आणि ही 'वॉशिंग्टनची कुऱ्हाड' कशीही वेडीवाकडी फिरू लागली. तिचा पहिला फटका शेजारील कॅनडास बसला. अमेरिकेस खेटून असलेला हा देश आपण 'घेऊन' टाकावा असे ट्रम्प यांस वाटले. हे वाटणे मनातल्या मनात असते तर एक वेळ ठीक. पण कोणताही मागचा-पुढचा विचार न करता मनातले धाडकन बोलून टाकायचे हा ट्रम्प यांचा खाक्या. तो याहीबाबत दिसून आला आणि कॅनडास अमेरिकेचे ५१ वे राज्य म्हणून अंकित करून टाकण्याची इच्छा त्यांनी बोलून दाखवली. पाठोपाठ आला आयात कॅनडीयन उत्पादनांवर आयात शुल्काचा दणका. साहजिकच कॅनडात हलकल्लोळ उडाला. हंगामी पंतप्रधान कार्नी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्यावर टीकेची एकच झोड उठवली आणि ट्रम्प यांचे भाष्य हे कॅनडाचा मानभंग करणारे आहे, अशी भूमिका घेतली. इतकेच नाही तर कार्नी यांनी अमेरिकेशी काडीमोड घेऊन कॅनडाच्या अर्थव्यवस्थेतून लवकरात लवकर अमेरिकेस बेदखल करण्याची भाषा सुरू केली. कार्नी यांच्या गाठीशी बँक ऑफ कॅनडा तसेच बँक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नरपदाचा दांडगा अनुभव आहे. एक ज्येष्ठ बँकर या लौकिकामुळे त्याच्या वक्तव्यात बोलभांड ट्रम्प यांच्यापेक्षा किती तरी अधिक शहाणपण होते. त्यामुळे ते पाहता पाहता लोकप्रिय झाले आणि त्यांच्या पक्षाचा शून्याखाली गेलेला आलेख पुन्हा झपाट्याने वर जाऊ लागला. अखेर ते विजयी झाले. त्यांच्यापुढे आव्हान होते पीअर पॉइलीव्हर यांच्या 'कंझर्व्हेटिव्ह' या प्रतिगामी पक्षाचे. या पॉइलीव्हर यांचे वर्णन कॅनडाचे ट्रम्प असे केल्यास वावगे ठरणार नाही. वावदूकपणाबाबत दोघांतील साम्य कौतुकास्पद. प्रत्यक्षात औषधासाठी वापरणे अपेक्षित असलेले पण अमली पदार्थ म्हणून गैरवापर होते त्या फेंटानिल रसायनाच्या निर्मितीवर पूर्ण बंदी घालण्याची भाषा, धनाढ्यांवरील कर वाढवण्यास नकार, उदारमतवादी विद्यापीठांचे केंद्रीय अनुदान थांबवण्याचा इशारा इत्यादी मुद्द्यांमुळे हे पॉइलीव्हर चांगलेच लोकप्रिय होते. आर्थिक विपन्नावस्था अनुभवणारा समाज नेहमीच धार्मिक आणि सांस्कृतिक प्रतिगामींकडे आकृष्ट होत असतो. याची उदाहरणे अनेक. त्यामुळे पॉइलीव्हर हे कॅनडात चांगलेच लोकप्रिय होते. त्यात त्यांनी ट्रुडो सरकारवर भ्रष्टाचार आणि आर्थिक गैरव्यवस्थापनासाठी केलेली घणाघाती टीका त्यांच्या लोकप्रियतेत भर घालत होती. ट्रुडो यांच्या दहा वर्षांच्या सत्ताकाळात कॅनडाची अधोगतीच झाली आणि हे दशक राष्ट्रउभारणीच्या कार्यात पूर्ण वाया गेले ही त्यांची टीका कॅनडात बहुतेकांस स्वीकारार्ह होती. त्यामुळे पॉइलीव्हर यांचा विजय निश्चित मानला जात होता. पण झाले भलतेच. शेजारील अमेरिकेत ट्रम्प यांचा झंझावात आला आणि त्यात कॅनडातील प्रति-ट्रम्प पॉइलीव्हर यांचा राजकीय तंबू उन्मळून पडला. या निवडणुकीत त्यांच्या पक्षाची इतकी वाताहत झाली की खुद्द पॉइलीव्हर यांनाही पराभव पत्करावा लागला. गेल्या काही निवडणुकांच्या तुलनेत पॉइलीव्हर यांच्या 'प्रतिगामी' पक्षास मिळालेल्या मतांच्या प्रमाणात काहीशी वाढ झाली खरी, पण तिचे रूपांतर ते विजयात करू शकले नाहीत. या निवडणुकांतील आपल्या दृष्टीने आनंदाची बाब म्हणजे खलिस्तानवादी 'द न्यू डेमॉक्रॅटिक पार्टी'चा झालेला दारुण पराभव. जगमित सिंग यांच्या नेतृत्वाखालील या पक्षाच्या मत टक्केवारीत चार वर्षांपूर्वीच्या तुलनेत या वेळी चक्क डझनभर टक्क्यांची घट झाली. सत्ता बनवण्यात सहभागी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पक्षास राष्ट्रीय राजकारणात आपले स्थान राखता येईल इतकीही मते पडली नाहीत. खुद्द सिंग यांसही पराभवाचा सामना करावा लागला. ही ब्याद तसेच पंतप्रधान ट्रुडो कॅनडाच्या लोकप्रतिनिधिगृहात आता नसतील. त्यामुळे भारत-कॅनडा यांच्यातील फाटलेले संबंध सुधारण्याची खात्री बाळगता येईल. भारतीय वंशाचे लाखो नागरिक आणि तितकेच भारतीय विद्यार्थी आज कॅनडात विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण घेत आहेत. त्यांच्यासाठी उभय देशांचे संबंध सुधारले जाणे गरजेचे होते. जगमित-ट्रुडो यांच्या पराभवामुळे आणि त्याहीपेक्षा अधिक कार्नी यांच्या विजयामुळे संबंध सुधार प्रक्रियेस गती मिळेल. आपण ट्रुडो यांच्या विविध विषयांवरील धोरणांपासून फारकत घेऊ असे कार्नी यांनी गेल्या तीन महिन्यांत अनेकदा सूचित केले. एक यशस्वी बँकर या नात्याने कोठे गुंतवणूक केल्यास अधिक परतावा मिळतो याचे ज्ञान त्यांना अर्थातच इतरांपेक्षा अधिक असणार. त्यामुळे ट्रुडो यांच्याप्रमाणे काही भावनिक मुद्द्यांवर ते आपली ऊर्जा खर्च करणार नाहीत. तेव्हा कार्नी यांच्या उदयामुळे भारत-कॅनडा संबंधांचे नवे पर्व सुरू होण्याची शक्यता अधिक. विशेषत: यापुढे कॅनडाचे संबंध अमेरिकेशी पूर्वीप्रमाणे असणार नाहीत असे स्पष्ट विधान कार्नी यांनी केलेले असल्याने त्यांना नवीन व्यापार भागीदारांची गरज अधिक असणार हे उघड आहे. ही बाब आपल्यासाठीही सोयीची. अशा तऱ्हेने कॅनडाच्या निवडणुकांचा निकाल स्वागतार्ह ठरतो. त्याविषयी समाधान व्यक्त करताना एक निरीक्षण नोंदवणे आवश्यक. ते पराभूत पीअर पॉइलीव्हर यांच्याविषयी आहे. आपल्या धोरणांमुळे ते ट्रम्प यांना जवळचे मानले जात. ट्रम्प यांच्या अमेरिकी प्रतिगामी रिपब्लिकन पक्षाप्रमाणे पॉइलीव्हर हेही कॅनडातील प्रतिगामी कंझर्व्हेटिव्ह पक्षाचे प्रतिनिधित्व करतात. पण या ट्रम्प-साधर्म्य आणि साहचर्यामुळेच कॅनडातील मतदारांनी त्यांना दूर राखले. शेजारील देशात एक असताना आपल्याही देशात प्रति-ट्रम्प नको असा विचार मतदारांनी केला असणार. म्हणजे ट्रम्प यांच्याशी दोस्ताना वा साधर्म्य हे अन्य देशांत आतबट्ट्याचे ठरू शकते असा संदेश या निवडणुकीतून मिळतो. हरते कार्नी जिंकले ते ट्रम्प यांच्यामुळे आणि विजय मार्गावरील पॉइलीव्हर पराभूत झाले तेही ट्रम्प यांच्यामुळे. अशा तऱ्हेने कॅनडाच्या निवडणुकीत ट्रम्प हरले, ट्रम्प जिंकले असे म्हणता येईल.



उंद्री प.दे ता. मुखेड येथे महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त ध्वजारोहण व पुजन माधवराव पाटील गोणारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया मनोज बिरादार)

# नांदगाव शहरात महात्मा बसवेश्वर जंयती उत्साहात साजरी

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



अक्षय तृतीया वीरशैव लिंगायत समाजाचे धर्म प्रसारक जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्ताने नांदगाव शहरातील तहसील कार्यालयासह विविध सरकारी कार्यालयामध्ये तसेच बाजार समितीमध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार घालून जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. नांदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सचिव अमोल खैरनार व्यापारी असोसिएशनच्या वतीने व्यापारी भूषण धूत यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार घालून जयंती साजरी केली . यावेळी बाजार समितीचे जितेंद्र गरुड' बाबासाहेब साठे' शरद आहेर' योगेश आहेर सानप ' संचालक निलेश इपर ' व्यापारी भूषण धूत ' दीपक कासलीवाल ' अमोल शिंदे ' अमोल आहेर ' मुकुंद खैरनार ' गोकुळ खैरनार ' सुनील आहेर ' आशिष पाटील ' बाळासाहेब गोराडे ' रामनिवास करवा ' ज्ञानेश्वर वाघ ' रोशन धूत ' राहुल फोफलिया ' अमोल खैरनार ' सचिन बैरागी ' निलेश बोराडे ' संदीप फोफलिया ' समाधान भोसले ' जीवन खैरणार आदीसह समितीचे कर्मचारी हमाल मापारी शेतकरी बांधव उपस्थीत होते .

# देगलूर महाविद्यालयातील प्रा.सौ अनिता देबडवार सेवानिवृत्त

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------



येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील कनिष्ठ विभागातील राज्यशास्त्र या विषयाच्या अध्यापक सौ.अनिता देबडवार [कोल्हे ]या नियत वयोमाना नुसार आज दि. ३० एप्रिल २०२५ रोजी सेवानिवृत्त झाल्या. यानिमित्ताने अ. व्या. शिक्षण संस्था व देगलूर महाविद्यालयाच्या वतिने प्रा.सौ.देबडवार [कोल्हे] यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.मोहन खताळ होते.वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार उपप्राचार्य प्रा.डा◌ॅ.एम एम चमकुडे, प्रा.डॉ.शेरीकर व्हि.जी.अधीक्षक गोविंद जोशी,पर्यवेक्षक संग्राम पाटील प्रा.डा◌ॅ.लक्षट्टे रत्नाकर यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# लिंकिंग विरोधात विक्रेते, रा.खते खरेदी करणार बंद

## कृषी विक्रेता संघटना 'माफदा'चा सरकारला निर्वाणीचा इशारा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



रासायनिक खते पुरवठादार कंपन्यांकडून खतामधील लिंकींग बंद होत नाही,तोपर्यंत दि. १ मे पासून राज्यभरात सर्वत्र या कंपन्यांच्या खतांची खरेदी बंद करण्याचा निर्णय महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टीसाईडस् सीडस् डिलर्स असोसिएशन (माफदा) या संघटनेने घेतला आहे. याची माहिती राज्य सरकारच्या कृषी कळविण्यात आली आहे. विभागाला राज्याच्या कृषी आयुक्तालयातील कृषी संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) सुनील बोरकर यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.त्यात म्हटले आहे की, गेली चार ते पाच वर्षे रासायनिक खते पुरवठादार कंपन्याकडून राज्यातील विक्रेत्यांना या खतांचा पुरवठा होताना विक्रेत्यांची मागणी नसताना इतर खते लिंकींग पद्धतीने दिली जातात.मात्र, शेतकरी त्यांना आवश्यक असलेल्या खता व्यतिरिक्त लिंकींग पद्धतीने पुरवठा झालेली इतर खते खरेदी करीत नाहीत.त्यामुळे या खतांचा विक्री न झालेला साठा विक्रेत्यांकडे पडून आहे.त्याचा आर्थिक बोजा विक्रेत्यांवर पडत आहे.त्यामुळे खतांचे हे लिंकिंग बंद होणेसाठी माफदा संघटनेच्या माध्यमातून वेळोवेळी सरकारकडे, कृषी विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे. मंत्री, कृषी आयुक्तालयाकडून कंपन्यांना खतामधील लिंकींग बंद करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत परंतु, त्यावर कंपन्यांकडून अंमलबजावणी होत नाही आणि त्यांच्यावर सरकारकडून कारवाई होत नसल्याचे चित्र आहे.त्यामुळे राज्यातील विक्रेत्यामध्ये नाराजीची भावना निर्माण झालेली आहे.त्यांनी लिंकींग पध्दती पूर्णपणे बंद व्हावी,अशी मागणी केली आहे.याची दखल घेतली जात नाही तोपर्यंत रासायनिक खतांची खरेदी न करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर अध्यक्ष विनोद तराळ, महासचिव विपीन कासलीवाल यांच्या स्वाक्षरी आहेत.

# मुंगसे येथे स्वामी विवेकानंद संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयात 1 मे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



मुंगसे (ता. मालेगाव) आज १ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन संपूर्ण राज्यभरात साजरा केला जातो. स्वामी विवेकानंद संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयात साजरा करण्यात आला यावेळी स्वामी विवेकानंद संस्थेचे सेक्रेटरी आदरणीय श्री. राजेंद्र रामचंद्र सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पुजनाने आणि ध्वजारोहण करून करण्यात आली स्वामी विवेकानंद संस्थेच्या अध्यक्षा सौ. संगीता राजेंद्र सूर्यवंशी स्वामी विवेकानंद संस्थेचे विश्वस्त श्री. सुजित सूर्यवंशी, सौ. रुचिता सूर्यवंशी, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य एम. बी. निकम नर्सिंग कॉलेज चे प्राचार्य अविनाश पवार आय टी आय चे प्राचार्य ज्ञानदीप निकम उपस्थित होते. यावेळी स्वामी विवेकानंद संस्थेचे सेक्रेटरी आदरणीय श्री. राजेंद्र रामचंद्र सूर्यवंशी यांनी आपल्या भाषणात बोलले कि १ मे हा दिवस म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, श्रमिकांचा आणि लोकशाही हक्कांचा उत्सव. या दिवशी आपल्या राज्याच्या उभारणीत आणि श्रमिकांच्या योगदानाचा सन्मान करणं ही आपली जबाबदारी आहे. जगभरात १ मे रोजी कामगारांच्या हक्कांचा व श्रमाचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो. १८८६ साली अमेरिकेच्या शिकागो शहरात कामगारांनी ८ तास काम, ८ तास विश्रांती आणि ८ तास मनोरंजन ह्याची मागणी करत आंदोलन केलं होतं. त्यानंतर जगभर हा दिवस कामगार दिन म्हणून ओळखला जाऊ लागला. यावेळी त्यांनी आपल्या भाषणात सांगितले यावेळी प्राचार्य एम. बी. निकम यांनी आपल्या भाषणात सांगितले १ मे हा दिवस आपल्या मराठी ओळखीचा सन्मान. आपल्या भाषेच्या, संस्कृतीच्या जपणुकीचा दिवस. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात सहभागी झालेल्या वीरांना अभिवादन करण्यासाठी आणि नव्या पिढीला आपल्या इतिहासाची ओळख. म्हणूनच दरवर्षी १ मे ला आपण महाराष्ट्र दिन साजरा करून आपल्या भूमीचा आणि तिच्या इतिहासाचा अभिमान व्यक्त करतो. यावेळी त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना सांगितले सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राध्यापक दीपाली पाचपुते व आभार प्राचार्य एम. बी. निकम यांनी केले.यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकत्तर कर्मचारी, बी. फार्मसी डी. फार्मसी बी. एस. सी नर्सिंग व आय टी आय चे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून मंगल कलश यात्रेचे दोंडाईचा शहरात राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागा तर्फे भव्य स्वागत



संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेशच्या वतीने देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत यंदाच्या ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे ते ४ मे दरम्यान गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.या महोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण राज्यातून काढण्यात येणाऱ्या मंगल कलश रथयात्रेचा दोंडाईचा शहरात या रथयात्रेचे स्वागत केले. ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या संकल्पनेतून आयोजित मंगल कलश रथयात्रेचे माजी मंत्री आमदार मा. अनिल दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे धुळे जिल्हाध्यक्ष सुरेश आण्णा सोनवणे व तालुकाध्यक्ष दिपकराव जगताप यांच्यासह दोंडाईचा येथे आगमन झाले. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री डॉ. नाना साहेब हेमंतराव देशमुख, माजी नगराध्यक्ष बापु साहेब रविंद्र देशभुख महिला प्रदेश सरचिटणीस पुजा ताई खडसे , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाच्या जिल्हाध्यक्ष नाजीम शेख यांच्या वतीने धुळे- दोंडाईचा चौफुली येथे रथयात्रेचे स्वागत करण्यात आले . सदर प्रंसगी राष्ट्रवादी महिला धुळे जिल्हाध्यक्ष संजिवनी ताई गांगुर्डे, राष्ट्रवादी ओ बि सी सेल चे जिल्हाध्यक्ष ईश्वर माळी , युवती जिल्हाध्यक्ष रेखा ताई सुर्यवंशी, जिल्हा सरचिटणीस ऋषीकेश पाटील, माजी बांधकाम सभापती महेंद्र पाटील, माजी नगरसेवक भुपेंद्र धनगर ,युवक उपाध्यक्ष दिपक गिरासे, जिल्हा सरचिटणीस अमृत पाटील, हर्षवर्धन वेंदे युवक जिल्हा सरचिटणीस मोहसिन शेख , गोपाल कोळी , शहराध्यक्ष रईस शेख , शहर कार्याध्यक्ष रियाज मिर्झा, भैय्या ड्रायव्हर, अश्पाक मनियार , दगा शाह पेंटर राजा मन्यार,बिलाल खाटीक ,नासीर शेख, आसिफ पिजारी, जाविद पिंजारी , समीर कुरेशी, शाहरुख शेख, फारूक पटवा , सत्तार खान , सलीम मन्यार ,नदिम शाह,आवेस शेख, शाहरुख बागवान, , अरबाज मन्यार , फारूक पिंजारी, फिरोज शाह, , हाशिम शेख, साहिल बागवान, व ईतर पदाधिकारी , कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# एपेक्स हॉस्पिटलचा कारनामा...

## रुग्णालयाकडून सर्वसामान्यांची होणारी लूट शासनाने थांबवण्याची रुग्णांच्या नातेवाईकांची मागणी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------



सटाण्यातील एपेक्स नामक खाजगी हॉस्पिटलचे काही कारनामे समोर येवू लागले आहेत. सटाणा आणि आसपासच्या परिसरातील लोकांना चांगले उपचार मिळावेत म्हणून गरजू रुग्ण या हॉस्पिटलमध्ये दाखल होतात मात्र त्यांच्या कारनाम्याने रुग्ण बेजार होतात. फेब्रूवारी महिन्यात अशोक भोये नामक एका आदिवासी तरुणाचा अपघात झाला असता त्यांना आपत्कालिन परिस्थितीत सदर रुग्णालयात दाखल केले. संध्याकाळी सात- आठ च्या दरम्यान दाखल केलेल्या रुग्णाला दुसऱ्या दिवशी रुग्णालयातून सोडण्यासाठीचे म्हणजेच एका रात्रीचे बील २० हजार इतके काढण्यात आले. रुग्णाची परिस्थिती अत्यंत हलाखीची असताना इतके भरमसाठ बील आकारल्याने त्या रुग्णाचे नातेवाईक प्रचंड चिंतेत पडले शेवटी विनवण्या करुन थोडेफार बील सवलत करुन त्या रुग्णाला तेथून हलविण्यात आल्याचे रुग्णाच्या नातेवाईकांनी सांगितले. त्यानंतर एका माजी सैनिकाच्या वडिलांना अपघात पश्चात उपचारार्थ दाखल केले असता, त्या रुग्णाच्या उपचारानंतर सरकारी मदतीसाठी कागदपत्र दाखल केले असता रुग्णाचे नाव, माजी सैनिकाने फक्त प्रथम नावाने नोंद केली असल्याने, त्या पद्धतीचे कागदपत्र अपेक्स कडून मागणी केली; मात्र अपेक्स ने उपचारावेळी रुग्णाचे नाव आणि आडणावाने कागदपत्र जारी केले असल्याने रुग्णाचे नातेवाईक माजी सैनिक यांनी रुग्णालयाकडे सदर रुग्ण हे देवबा शिंदे म्हणजेच देवबा हेच आहेत यापद्धतीचे कागदपत्र मागितले मात्र तसा खुलासा करण्यास रुग्णालयाने असहकार्य केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. रुग्णालयाकडे जर देबवा शिंदे अशी नोंद असेल उपचाराच्या दरम्यान दुसरा कोणी देवबा नावाने रुग्ण दाखल नसेल आणि माजी सैनिकाने सरकारदरबारी कागदोपत्री देवबा ही नोंद केली असेल तर रुग्णालयाला त्या पद्धतीचा खुलासा करण्यास काय हरकत असावी ? सदर परिस्थिती मांडली तर रुग्णालयाचे संचालक डॉक्टर यांकडून फोनद्वारे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जाते असे रुग्णाचे नातेवाईकांनी सांगितले. तसेच आम्ही जर त्यावेळी माजी सैनिकाच्या वडिलांवर उपचार केले नसते तर ते दगावले असते अशी असंवेदनशील आणि उपकाराची भाषा देखील सदर डॉक्टरने केल्याबाबत तक्रार मांडली. सिमेवर प्राणाची बाजी लावून मायभूमीची सेवा केलेल्या माजी सैनिकाच्या बापाप्रती जर ही भाषा संबंधीत डॉक्टरची असेल तर या कृतघ्नतेला काय म्हणावे ? अशी चर्चा होत आहे. सर्वसामान्य आणि माजी सैनिकालाही देण्यात आलेला त्रास जर मांडला तर थेट गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्यात येत असेल तर इतकी मुजोरी येतेच कुठून हा प्रश्न याठिकाणी उपस्थित होतो. खाजगी रुग्णालयांकडून सर्वसामान्य रुग्णांची होणारी हेळसांड थांबविण्यासाठी, शासनाने कठोर पावलं उचलली पाहीजेत, हे पुन्हा याठिकाणी अधोरेखित होते.

# नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे येथे महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन उत्साहात साजरा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------------



प्राचार्य श्री रावसाहेब संजयकुमार पाटील यांच्या शुभ हस्ते शालेय ध्वजारोहण पार पडले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी चे विश्वस्त अण्णासाहेब यु एल बोरसे सर उपस्थित होते.विद्यालयाचे संगीत शिक्षक श्री राकेश खैरनार व गीतमंच यांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताचे गायन केले. दिनविशेष श्री आर पी सुर्यवंशी यांनी सादर केला. प्राचार्य रावसाहेब संजयकुमार जी पाटील यांच्या हस्ते वर्गात प्रथम येणारे विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच केक भरवून कौतुक करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य मा.रावसाहेब संजयकुमार पाटील यांनी महाराष्ट्र दिन औचित्याचे महत्व तसेच विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी संदर्भात आवश्यक त्या सूचना केल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री ए के पाडवी यांनी केले. मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री रघुनाथ जी नागरे , शिक्षक प्रतिनिधी एच डी पवार, कनिष्ठ महाविद्यालय प्रतिनिधी प्रा.एम व्हि सावंत,शिक्षकेतर प्रतिनिधी सिद्धार्थ मोहिते भाऊसाहेब सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# श्री सोमेश्वर कृषी मार्केट दहिवेल येथे 1 मे महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा

## कामगार दिनानिमित्त कामगारांचा सत्कार

श्री प्रवीण काकुस्ते
साक्री प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------







दहिवेल येथे एक मे महाराष्ट्र दिनानिमित्त श्री सोमेश्वर कृषी मार्केट दहिवेल येथे कांदा व्यापारी श्री निशांत शेठ सह पत्नी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच कामगार दिनानिमित्त श्री सोमेश्वर कृषी मार्केटचे संस्थापक अध्यक्ष श्री मनोज शेठ बुधाजी चौधरी व मार्केटचे व्यापारी बंधू यांच्याकडून कांदा मार्केट मधील सर्व कामगारांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. ध्वजारोहण व कामगारांचा सत्कार करताना उपस्थित जि. प. सदस्य श्री खंडू शेठ कुवर, महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे साक्री तालुका उपाध्यक्ष श्री संजय कालेश्वर बच्छाव, मार्केटचे अध्यक्ष श्री मनोज शेठ चौधरी, संचालक श्री संदीप शेठ माळी, श्री हेमंत चौधरी, श्री भगवान चौधरी, श्री संतोष चौधरी, श्री शरद कोकणी, श्री कैलास ठाकरे, गितेश चौधरी व कामगार बंधू व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# कामगारांचा सन्मान करुन कामगार दिन व महाराष्ट्र दिन साजरा

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------



शिरूर ग्रा.पंचायत ,रामलिंग येथे ध्वज फडकुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.

आज रामलिंग महिला उन्नती बहु सामाजिक संस्थेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी रामलिंग ग्रा.पंचायत मध्ये अनेक काम असतील,त्यात स्वच्छता करणे,पाणी सोडणे,इतर अनेक काम कामगार प्रमाणिक पणे करत असतात ,या दिवशी त्यांचा दिवस म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले.कारण कामगार यांचे स्थान प्रत्येक कामाचा ठिकाणी खूप उच्च आहे, त्यांचा विषयी आदर सर्वांनी बाळगला पाहिजे म्हणून त्यांना आज शाल ,श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. १ मे रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली होती.याच दिवशी कामगारांनी स्वतःचा हक्कासाठी आणि न्याय्य वेतनासाठी सुरू झालेल्या चळवळीचा हा स्मरण दिन हा कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. यादिवशी महाराष्ट्रात अनेक उपक्रम राबून हा दिवस साजरा केला जातो. यावेळी रामलिंग ग्रा .सरपंच - शिल्पा गायकवाड,उपसरपंच - सचिन घावटे, मा.उपसरपंच - यशवंत कर्डिले, उद्योजक - विठ्ठल जगदाळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष - विजय दौंडकर,रमेश कर्डिले,ग्रामसेवक - केदारी भाऊसाहेब , मुख्याध्यापिका - सुनिता जगताप,सर्व शिक्षक वृंद, मांजरे मॅडम, टोणगे मॅडम, जगदाळे सर, निकिता देव्हाडे, अर्चना माने, ग्रा.कर्मचारी महाजन भाऊ, नारायण गायकवाड, स्वप्नील गायकवाड, अविनाश गोसावी,योगेश माने,छाया ढवळे अनेक मान्यवर उपस्थित होते. रामलिंग महिला उन्नती बहु सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा - राणी कर्डिले यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# देगलूर महाविद्यालय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या माहिती दर्शिकेचे प्रकाशन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-----------------



येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयात कनिष्ठ विभागामार्फत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चालविण्यात येते. दरवर्षी शैक्षणिक सत्रात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन परीक्षा आदी उपक्रम राबविण्यात येतात या उपक्रमाची माहिती महाविद्यालयातील तसेच परिसरातील विद्यार्थ्यांना व्हावी याकरिता स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतिने माहिती दर्शिका काढण्यात आली आहे या दर्शिकेचे प्रकाशन महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून संस्थेचे कोषाध्यक्ष विलासराव तोटावार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले यावेळी महाविद्यालयात घेतलेल्या स्पर्धा परिक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांस स्व.व्यंकुबाई शंकराव तोटावार यांच्या स्मरणार्थ बक्षीस देऊन गौरविण्यात आले. दहावी नंतर विद्यार्थ्यांनी इ.अकरावी मधे महाविद्यालयात प्रवेश घेऊन उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळेस करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ कार्यकारणी सदस्य रवींद्र आप्पा द्याडे सदस्य विजयकुमार उनग्रतवार, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी उपप्राचार्य डॉ. एम.एम. चमकुडे डॉ.व्ही.जी.शेरीकर पर्यवेक्षक एस.एन. पाटील आदी उपस्थित होते

# अर्धापूरच्या संदिप कळासरे यांना पालक मंत्र्यांच्या हस्ते जिल्हा युवा पुरस्काराने सन्मानित

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------




महाराष्ट्र दिनानिमित्त नुकताच अर्धापूर येथील संदिप हरीभाऊ कळासरे यांना २०२४-२०२५ या वर्षासाठीचा जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मा. पालकमंत्री श्री. अतुलजी सावे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जिल्हाधिकारी श्री. राहुलजी कर्डीले आणि माजी मुख्यमंत्री श्री. अशोकरावजी चव्हाण व पोलीस महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप तसेच आयुक्त श्री. महेशकुमार डोईफोडे, श्रीमती मेघना कावली यांची उपस्थित होती. जिल्हा युवा पुरस्कार हा महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्यामार्फत दिला जातो. समाजहितासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांचा गौरव करण्यासाठी आणि त्यांना युवक विकासाच्या दिशेने प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार प्रदान केला जातो.

संदिप कळासरे यांनी नांदेड परिसरातील अनेक ठिकाणी पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि युवकांना सोबत घेऊन त्यांच्या गुणांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून दिले. उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी आदिवासी भागातील महिलासाठी कार्य केले. युवकांसोबत घेऊन समाजातील इतर नागरिकांनाही प्रेरित करत सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. जिल्ह्यातील युवकांसाठी केलेले अतुलनीय कार्य उत्कृष्ट असुन त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना २०२४-२५ चा महाराष्ट्र शासनचा जिल्हा युवा पुरस्कार जाहीर करण्यात आला.

या पुरस्कारामध्ये ₹१०,००० रोख रक्कम, सन्मानचिन्ह, गौरवपत्र, शाल-श्रीफळ आणि पुष्पगुच्छ यांचा समावेश होता. पुरस्कार वितरण समारंभात संदिप कळासरे यांनी हा सन्मान स्वीकारला.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# नंदुरबारच्या काणे गर्ल्स हायस्कूलचे शिक्षक जितेंद्र पगारे यांना राज्य शासनाचा गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार प्रधान

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------



नंदुरबार जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नंदुरबार येथून श्री जितेंद्र दामोदर पगारे (सर) नंदुरबार जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२२-२३ पुरस्कार वितरण करण्यासाठी समारंभ उपस्थित रहाण्याबाबत निमंत्रित करण्यात आले आहे. क्रीडा क्षेत्रात त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला आहे काणे गर्ल्स हायस्कूल नंदुरबार येथील ते क्रीडा शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आजवर आपल्या शाळेच्या मुलींना अनेक स्पर्धांमध्ये राज्यस्तरावर फुटबॉल हॉलीबॉल खोखो कबड्डी या खेळांमध्ये प्रविण्य मिळवण्यास मदत केली आहे व आपल्या शाळेसाठी अनेक पुरस्कार ही ते राज्यस्तरा कडून घेऊन आले आहेत. त्यांची ही आजवरची कामगिरी अतिशय वाखाडन्या जोगी आहे. नंदुरबार जिल्हा क्रीडा पुरस्कार समिती, नंदुरबार येथे सन. २०२२-२३ या वर्षीचा जिल्हा क्रीडा पुरस्कार जाहिर करण्यात येत असुन सन २०२२-२३ या वर्षीचा गुणवंत क्रीडा मार्गदर्शक हा पुरस्कार श्री जितेंद्र दामोदर पगारे सर यांना जाहिर झालेला आहे. त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन. सदरचा पुरस्कार त्यांना आज दि. ०१ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनाच्या शुभप्रसंगी मा. पालकमंत्री माणिकराव कोकाटे महोदय, नंदुरबार जिल्हा यांचे शुभहस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान चिन्ह व गौरव पत्र प्रदान करण्यात येणार आहे व पुरस्काराची रक्कम रु. १०,०००/-(अक्षरी रुपये दहा हजार फक्त) तरी सदरची रक्कम अदा करण्याकरीता आली आहे

तरी त्यांनी सदरचा क्रीडा पुरस्कार स्वीकारण्यासाठी दि. ०१ मे २०२५ रोजी सकाळी ०७.०० वाजता पोलीस कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, नंदुरबार येथे उपस्थित होते (सुनंदा पाटील) जिल्हा क्रीडा अधिकारी नंदुरबार यांचा अधिपत्याखाली ही निवड करण्यात आली आहे.

# शिवबा संघटना सभासद नोंदणी व कार्य अहवाल रायगड वर संपन्न

## गाव तिथे शाखा, घर तिथे मावळा मोहीम राबवणार

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------

छत्रपती शिवरायांच्या विचारांवर प्रेरित असणाऱ्या संघटनेचा सभासद नोंदणी शुभारंभ व कार्य अहवालाचे प्रकाशन श्री क्षेत्र रायगड येथे छत्रपती शिवरायांच्या चरणी कार्य आव्हान व सभासद नोंदणी फॉर्म अर्पण हा कार्यक्रम संपन्न झाला. छत्रपती शिवरायांच्या विचारांचा वसा आणि वारसा घेऊन शिवबा संघटना सभासद नोंदणी करणार आहे यामध्ये समाजसेवेची आवड असणाऱ्या तरुणांना मोठ्या प्रमाणात सहभागी करून त्यांना विविध पदांवर काम करण्याची संधी देणार आहे. संघटनेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्याचं काम सातत्याने



प्रत्येक गावामध्ये प्रत्येक वस्तीवर शिवबा संघटनेचे सभासद तयार करून त्या गावातील प्रश्न सोडवण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून होणार आहे.
**अनिल शेटे**
**अध्यक्ष, शिवबा संघटना, पारनेर**

सुरू असते. संघटनेचा एक छोटासा कार्य अहवाल प्रकाशित करण्यात आला आहे. त्यामध्ये संघटनेच्या माध्यमातून पूरग्रस्त मदत कोरोना काळ, गड किल्ले संवर्धन, बळीराजाला सहाय्य, विद्यार्थी बांधवांसाठी केलेले काम ,रक्तदान आरोग्य शिबिर अशा विविध कार्याच उल्लेख अहवालामध्ये करण्यात आला आहे त्या माध्यमातून संघटनेचे कार्य तळागाळात पोहोचण्यासाठी मदत होईल असे शिरूर तालुका प्रमुख सोमनाथ भाकरे यांनी सांगितले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, दुर्ग संवर्धन अध्यक्ष राजूभाऊ लाळगे, दुर्गा संवर्धन उपाध्यक्ष बाळासाहेब भंडारी, शिरूर तालुकाप्रमुख सोमनाथ भाकरे, युवक तालुकाप्रमुख केशव शिंदे, ओंकार जाधव , अभी गाडीलकर, संतोष साळुंखे, मच्छिंद्र लाळगे, ज्ञानेश्वर जी कवडे , शांताराम पाडळे, दत्ता टोणगे, गणेश भुकन, शशिकांत काळे ,दत्तात्रय सोदक, निलेश वरखडे ,आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# बेटमोगरा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी

## भीमशाहीर मनोजराजा गोसावी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांचे भीमगीतांच्या माध्यमातुन उपस्थित आंबेडकरी जनतेचे प्रबोधन केले

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------------



महामानव, युगपुरुष, द सिम्बॉल ऑफ नॉलेज, विश्वरत्न, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मुखेड तालुक्यातील मौजे बेटमोगरा येथे रविवार दि.२७ एप्रिल २०२५ रोजी मोठ्या थाटामाटात व मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. रविवार दि.२७ एप्रिल रोजी सकाळी ९:३० वा.च्या वाजता येथील धम्मशील बुद्ध विहार या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुज्य भंते संघप्रिय, नांदेड, पोलीस निरीक्षक लक्ष्मणराव केंद्रे (पो. स्टे. मुखेड), अनिल सिरसे ( जिल्हाध्यक्ष रि. प. सेना, नांदेड), डॉ. राहुल कांबळे, सह ध्वजारोहन कार्यक्रमाचे अध्यक्ष दत्तात्रय बालाजी पाटील (संचालक कृ. उ. बा. स. मुखेड), अभिजीत पाटील (युवा उद्योजक), तसेच जयंती महोत्सवाचे संयोजक पत्रकार भारत सोनकांबळे बेटमोगरेकर, दिलीप भद्रे (जिल्हासचिव रि. प. सेना) व जयंती मंडळाचे अध्यक्ष- राजू भद्रे, उपाध्यक्ष -रितेश सोनकांबळे, सचिव- अनिल सोनकांबळे, कोषाध्यक्ष अशोक पोटफोडे, सहसचिव दिपक सोनकांबळे, आणि सर्व जयंती महोत्सवाचे पदाधिकारी यांनी महामानवाच्या प्रतिमेचे दीप, धूप, प्रज्वलित करून व पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. तद्नंतर पुज्य भंते संघप्रिय व पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या हस्ते पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आले. त्यानंतर भंते संघप्रिय यांनी उपस्थित बौद्ध उपासक उपासिका यांना त्रिशरन,पंचशील,वंदना सह मार्गदर्शन केले. यावेळी अनेक क्षेत्रातील मान्यवरांनी महामानवास पुष्पमाला अर्पण करून आदरांजली वाहीली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष दत्तात्रय बालाजी पाटील (संचालक कृ. उ. बा.स.मुखेड),अनिल सिरसे (जिल्हाध्यक्ष रि.प.सेना), डॉ.राहुल कांबळे, धनराज पाटील, सह ज्यांनी मुखेड शहरातून भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त संविधानाचा संदेश घेऊन सायकल यात्रेद्वारे प्रधानमंत्री यांना भेटावयास दिल्ली येथे गेलेले - हुसेनसाब निचलकर इत्यादींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर प्रकाश टाकला. दुपारच्या सत्रात सायंकाळी ४:०० वाजता अतिशय सुंदर देखाव्याने व लाईटिंग ने सजलेल्या राजरत्न रथ गाडी मधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप भद्रे यांनी तर सूत्रसंचालन पत्रकार भारत सोनकांबळे बेटमोगरेकर यांनी केले. त्यानंतर सोमवार दि.२८ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी, गायक, फुले शाहु आंबेडकर चळवळीचे राष्ट्रीय प्रबोधनकार भीमशाहीर मनोजराजा गोसावी आणि संच नागपूर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांचे गीत गायनातून कार्यक्रमावेळी उपस्थित आंबेडकरी जनसमुदायाचे प्रबोधन केले. बुद्ध भीम गीतांच्या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सह राजा सम्राट अशोक, महात्मा बसवेश्वर, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहु महाराज, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आदी महामानवांच्या प्रतिमेचे दीप धूप प्रज्वलित करुन पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तद्नंतर भीमशाहीर मनोजराजा गोसावी यांनी आपल्या सुमधुर आवाजातील युगपुरुषा तुला युगाची वंदना या वंदन गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली, त्यानंतर तुम्हा चालाया त्याने स्वतःचे पाय दिले, सांगा भीमरायाला सांगा तुम्ही काय दिले,तसेच मुझे पढे लिखे लोगो ने धोका दिया, याबरोबरच 'त्या बडोद्यात केला संकल्प भीमाने 'अहो पत्रात लिहिते रमा माझी चिंता ना करता शिका, मी लेकरांना संभाळते, तुम्ही साहेब स्वतःला जपा' या माता रमाईच्या गिताने उपस्थित महीला भगिनीं या गाण्याने प्रेरित झाल्या होत्या. भीम शाहीर मनोज राजा गोसावी यांनी आपल्या गीत गायनातून उपस्थितांचे प्रबोधन केले.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ नेते तथा रिपाई चे जिल्हाध्यक्ष गौतम काळे, अनिल सिरसे (जिल्हाध्यक्ष रि. प. सेना), डॉ. राहुल कांबळे, हे होते. तर या कार्यक्रमाला माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांचे प्रतिनीधी म्हणून धनराज पाटील व शिवा बाऱ्हाळे, तसेच प्रमुख उपस्थिती मध्ये मोहन गायकवाड हिब्बटकर, सिद्धार्थ कांबळे बेळीकर (युवा व्याख्याते), संदीप काळे, चिनू पाटील (प्रतिष्ठित नागरिक), नयुम दफेदार (सरपंच), भानुदास पाटील, सुरेश नवलेकर (माजी सरपंच), इत्यादींसह मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिका, महीला, पुरुष तसेच आंबेडकरी जनसमुदाय यावेळी उपस्थित होता. जयंती महोत्सव समिती चे संयोजक दिलीप भद्रे (जिल्हासचिव रि. प. सेना), पत्रकार भारत सोनकांबळे बेटमोगरेकर (संयोजक), हे होते. तर जयंती मंडळ अध्यक्ष राजू भद्रे,उपाध्यक्ष रितेश सोनकांबळे, सचिव अनिल सोनकांबळे कोषाध्यक्ष अशोक पोटफोडे, बालाजी सोनकांबळे, दिपक सोनकांबळे, निवृत्ती पोटफोडे, रामजी सोनकांबळे (शिक्षक), हरी कांबळे, यशवंत सोनकांबळे, दयानंद सोनकांबळे, रत्नाकर सोनकांबळे, शंकर सोनकांबळे, कृष्णा सोनकांबळे, रोशन सोनकांबळे, कपिल सोनकांबळे आदींनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार भारत सोनकांबळे यांनी केले.

# नाशिक जिल्ह्याच्या विकासासाठी शासन कटिबद्ध -मंत्री गिरीश महाजन यांचे प्रतिपादन

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



त्र्यंबकेश्वर येथे होणारा कुंभमेळा स्वच्छ व हरित होण्यासाठी लोकसहभाग महत्वाचा आहे. तसेच नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी येथे केले. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजवंदन समारंभ गुरुवारी पोलीस संचलन मैदानावर आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मंत्री महाजन यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध पुरस्कार, प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. मंत्री महाजन म्हणाले की, नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२६- २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. त्याचे जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून नियोजन सुरू आहे. मार्च महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे भेट देऊन सिंहस्थ कुंभमेळा कामकाजाचा आढावा घेतला. स्वच्छ आणि सुंदर, पर्यावरण पूरक कुंभमेळ्याच्या कामाला चालना देण्यात येईल. तसेच कुंभमेळ्यानिमित्त निर्माण होणाऱ्या पायाभूत सोयी सुविधांना प्राधान्य देण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी कोणत्याच गोष्टींची उणीव जाणवू देणार नाही. तसेच स्वच्छ व हरित कुंभ पार पडण्यासाठी लोकसहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नाशिक जिल्ह्यातील काही वाड्या, गावांना सध्या पाणीटंचाई जाणवत आहे. अशा ७८ वाड्या, गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. तसेच दहा गावांसाठी विहीर अधिग्रहण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील विविध धरणांमध्ये सुमारे ३३ टक्के जलसाठा आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ही टक्केवारी समाधानकारक आहे. प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर केला पाहिजे, असे महाजन यांनी नमूद केले. नाशिक जिल्ह्यात खरीप पीक कर्ज वितरणाला सुरुवात झाली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून १५ हजार १४५ सभासदांना १४८ कोटी रुपयांचे कर्ज वितरीत करण्यात आले आहे. पावसाळा जवळ आला आहे. यामुळे कर्ज वितरण प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. जिल्हा वार्षिक योजना सन २०२५- २६ करीता सर्वसाधारण योजनेसाठी ९०० कोटी, आदिवासी उपयोजनेसाठी ४४३ कोटी रुपये, तर अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १०१ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर आहे. महिला, तरुणींना आत्मनिर्भर करणे आणि महिलांच्या सुरक्षित प्रवासासाठी नाशिक शहरात १ हजार महिलांना पिंक (गुलाबी) ई रिक्षा योजनेच्या माध्यमातून लाभ मिळणार असल्याचे महाजन यांनी सांगितले. यावेळी आमदार सीमा हिरे, महानगर पालिका आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, सहायक जिल्हाधिकारी ओमकार पवार, अर्पित चौहान, अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, उपजिल्हाधिकारी तुकाराम हुलावले, रवींद्र भारदे, शुभांगी भारदे यांच्यासह लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाटीपाडा प्रकल्पग्रस्त वारसांना एका दिवसात मिळणार दाखले

## जिल्हा पुनर्वसन अधिकारी संजय बागडे यांनी इदगाव पाडा येथे घेतले शिबिर

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
----------------------



पाझरानदीवरील लाटीपाडा धरणग्रस्तांना ५०वर्ष झाले तरी आजपर्यंत प्रमाणीत न दाखले मिळाले नसल्याने येथील प्रकल्पग्रस्तांना नवीन जमिनी ही मिळाल्या नाहीत व प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरीही मिळाल्या नाहीत, नव्हे तर त्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून २ दाखलाही मिळाला नाही त्यासाठी सामाजिक कार्यकर्ते - डॉक्टर विशाल वळवी यांनी राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग नवी दिल्ली यांचे कडे - तक्रार दाखल केली होती न त्यावर नुकतीच सुनावणी होऊन आयोगाने लगेच जिल्हाधिकारी व पुनर्वसन अधिकारी यांना निर्देश केले व प्रकल्पग्रस्तांना लगेच दाखले द्या असा आदेश काढला. त्यानुसार आज अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर जिल्हा पुनर्वसन अधिकारी संजय बागडे यांनी इदगाव पाडा येथील जिल्हा परिषद शाळेत प्रकल्पग्रस्तांचे शिबिर आयोजित करून प्रकल्पग्रस्तांना आता या दाखल्यासाठी १८ कागदपत्रान ऐवजी आता केवळ ४ कागदपत्र त्यात स्वतःचा अर्ज, पोलीस पाटील चा दाखला, ग्रामसेवकाचा दाखला व भुसंपादन अधिकारी प्रकल्पग्रस्त झालेला गट नंबर सातबारा देऊन लगेच दिवसात प्रकल्पग्रस्त दाखला मिळणार आहे. त्यामुळे या प्रकल्प बाधित कुटुंबातील मुलगा, मुलगी नातू यांना सरकारी नोकरीत प्राधान्य मिळेल असे बागडे यांनी उपस्थितांना सांगितले. यावेळी व्यासपीठावर तहसीलदार दत्तात्रय शेजुळ, से.नि.ना. तहसीलदार अरुण जोशी, सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर विशाल वळवी, नायब तहसीलदार बापू बहिरम महेश पाटील, अर्चना पोळ, योगेश जिरे, कामिनी महाले, अजय पाईकराव, सर्कल पी एन गावित, तलाठी संदीप चौरे उपस्थित होते. यावेळी प्रकल्पग्रस्त नागरिकांनी आपल्या समस्या पुनर्वसन अधिकारी संजय बागडे यांच्याकडे मांडल्या त्यांनी सर्व शंकांचे निरसन करत तलाठी व तहसीलदार यांना नागरिकांना लगेच मदत करण्याचे आदेश दिले. यावेळी पोपठ गांगुर्डे, विशाल आंबेकर, दास भाऊ पवार, देवराम पवार, मधुकर गांगुर्डे, संजय धुमाळ, तानाजी बहीरम, व प्रकल्प बाधित शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.